महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ७९८ /७७ दिनांक :- ०९ जून, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# बाराव्या म्हाडा लोकशाही दिनात ०८ अर्जांवर सुनावणी

लोकाभिमुख निर्णयातून म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिला अर्जदारांना दिलासा

मुंबई, दि. ०९ जून, २०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) आज वांद्रे (पूर्व) येथील गृहनिर्माण भवनात बारावा लोकशाही दिन आयोजित करण्यात आला. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या लोकशाही दिनात नागरिकांच्या ०८ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली.

आजच्या लोकशाही दिन कार्यक्रमात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी नागरिकांप्रती जबाबदारी, पारदर्शकता आणि न्यायप्रिय प्रशासनाचे महत्त्व अधोरेखित करत तत्परतेने निर्णय घेतला. दोन वर्षांपूर्वी बृहतसूचीतील संगणकीय सोडतीत पात्र ठरलेल्या अर्जदाराला ताबडतोब सदनिका देण्याचे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. श्री. नरेंद्र निगुडकर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील बृहतसूचीवरील जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील रहिवासी असून ते संक्रमण गाळयात वास्तव्यास होते. श्री. निगुडकर यांना सन २०२४ मध्ये बृहतसूचीवरून पात्र भाडेकरू/रहिवाशांसाठी काढण्यात आलेल्या संगणकीय सोडतीत सदनिका लागली. त्यानुसार त्यांनी रीतसर संक्रमण शिबिरातील गाळा मंडळाकडे सुपूर्द देखील केला. मात्र, अँटॉप हिल वडाळा पूर्व येथील सदनिकेचा ताबा विकासकाकडून मिळू शकला नाही याकरिता श्री. निगुडकर यांनी अर्ज केला होता. सदर प्रकरणाची गंभीर दखल घेत 'म्हाडा'चे उपाध्यक्ष श्री. जयस्वाल यांनी सदर प्रकरणी चर्चा करण्यासाठी संबंधित विकासकास तात्काळ म्हाडा कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच श्री. निगुडकर यांना वितरित करण्यात आलेल्या बृहतसूचिवरील सदनिकेचा ताबा उद्या सकाळी बारा वाजेपर्यंत देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

गोरेगाव पश्चिम येथील स्नेहदीप सोसायटीच्या मोकळया जागेत अनधिकृत बांधकाम केल्याच्या विरूद्ध श्री. संजय भैरे यांनी अर्ज केला होता. सदर अर्जावर सुनावणी करताना श्री. जयस्वाल यांनी सोसायटीच्या आवारातील मोकळया जागेवर होत असलेला अनधिकृत वापर तात्काळ थांबवण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच अनधिकृत बांधकामाबाबत पाहणी करून येत्या सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे देखील निर्देश दिले.

सांताक्रुझ सुंदर नगर कलिना येथील सिद्धेश सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या गेल्या बारा वर्षापासून रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत श्री. प्रकाश कुमार एन. एस. यांच्या तक्रार अर्जावर सुनावणी करताना श्री. जयस्वाल यांनी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांनी सर्वसाधारण सभा घेऊन सदर इमारतीचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्यास इच्छुक असल्याचा सर्वानुमते संमत ठराव करण्याबाबत सांगितले. सदर ठराव प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही म्हाडा स्तरावर करण्यात येईल, असे आश्वासन संस्थेच्या प्रतिनिधींना दिले.

तसेच गिरगाव येथील भंडारवाडा क्रॉस रोडवरील दुर्गादेवी सोसायटी या पुनर्रचित इमारतीच्या दुरुस्तीचे काम करून देण्याच्या मागणीसाठी श्री. गणेश शिंदे यांनी अर्ज केला होता. सदर अर्जावर सुनावणी

करताना श्री. जयस्वाल यांनी इमारतीच्या बाहेरील भागातील पाईपची व बंद पडलेल्या लिफ्टची तात्काळ दुरुस्ती करावी. सदर दुरुस्तीचे काम सोसायटीतील सभासदांनी नेमलेल्या देखरेख समितीच्या देखरेखीखाली करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी सदर इमारतीची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

छत्रपती संभाजी नगर म्हाडा कॉलनीतील गाळेधारक श्री. काशिनाथराव सदावर्ते यांना सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा वेळेत न केल्यामुळे म्हाडातर्फे व्याज आकारण्यात आले आहे. सदर व्याज माफ करण्याबाबत श्री. सदावर्ते यांनी आज अर्ज केला होता. सदर प्रकरणावर सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी संबंधित अर्जदार यांनी सदनिकेच्या उर्वरित देय विक्री किंमतीचा भरणा करावा व सदर विक्री किंमतीवरील करण्यात आलेल्या व्याज माफीबाबत प्राधिकरण स्तरावर कायदेशीर बाबी तपासून धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले.

आजच्या लोकशाही दिनात मुंबई मंडळाशी संबंधित ०४, मुंबई इमारत दुरूस्ती मंडळ ०३, छत्रपती संभाजी मंडळाशी संबंधित ०१ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली. म्हाडा लोकशाही दिन उपक्रमांतर्गत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी/अडचणी यांची न्याय्य व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून निराकरण करण्यात येत असल्याचे अनुभव अर्जदारांना आले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा




म्हाडा
MHADA
म्हाडा लोकशाही दिन


म्हाडा
MHADA
म्हाडा लोकशाही दिन
तत्पर निराकरण

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 798/77 Dt. June 9, 2025

**Press Release**

# Eight applications heard during MHADA's 12th Lokshahi Din

Applicants provided relief through citizen-oriented decisions by Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer, MHADA

Mumbai, 9 June 2025: The 12th Lokshahi Din of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) was held today at the Housing Bhavan, Bandra (East). The session was conducted under the leadership of Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer, MHADA. Hearings were conducted on eight citizen applications.

During the session, Mr. Jaiswal underlined the importance of accountability, transparency, and just administration. He issued prompt directives on each matter. In one such case, an applicant who had been allotted a tenement under the 2024 computerised lottery of the Master List, was granted immediate relief. Mr. Narendra Nigudkar, a resident of a cessed building under the Mumbai Building Repairs and Reconstruction Board and formerly residing in a transit tenement, had surrendered his unit after being allotted a tenement. However, due to delay by the developer, he had not received possession of the tenement at Antop Hill, Wadala (East). Taking serious note of the matter, Mr. Jaiswal instructed officials to call the concerned developer to the MHADA office immediately, and further directed that possession of the allotted tenement be handed over to the applicant by 12 noon the next day.

Yet in another case Mr. Sanjay Bhaire had submitted an application regarding unauthorised construction on an open space in Sneha Deep Society, Goregaon (West). During the hearing, Mr. Jaiswal instructed officials to initiate action to immediately stop unauthorised use of the society's open space. He further directed that an inspection be carried out and a report be submitted within seven days.

In the matter concerning Mr. Prakash Kumar N. S., who had filed a complaint about the long-pending redevelopment of Siddhesh Cooperative Housing Society in Kalina, Santacruz (East), Mr. Jaiswal directed that the members of the housing society should pass a general body resolution indicating their willingness to carry out redevelopment through MHADA. Mr Jaiswal assured that appropriate action would be taken by the Authority after receipt of the resolution.

Mr. Ganesh Shinde had requested repairs to the building of Durgadevi Society on Bhandarwada Cross Road, Girgaon. Mr. Jaiswal directed that the external piping and the non-functional lift be repaired immediately. He instructed that the repair work be carried out under the supervision of a committee appointed by the society's members and also directed the concerned officers to conduct a site inspection and submit a report.

In a case concerning Mr. Kashinathrao Sadavarte, a tenant of MHADA Colony, Chhatrapati Sambhaji Nagar, who had sought waiver of interest levied for delay in payment of the sale price of his tenement, Mr. Jaiswal instructed that the applicant must first clear the pending sale amount. He further stated that legal aspects related to interest waiver would be examined at the Authority level and a decision taken as per policy.

Of the eight applications heard during the 12th Lokshahi Din, four were related to the Mumbai Housing Board, three to the Mumbai Building Repairs and Reconstruction Board, and one to the Chhatrapati Sambhaji Nagar Board. Applicants expressed that their grievances were handled in a fair and timely manner under the Lokshahi Din mechanism.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA